पुढारी शहर-जिल्हा सिंधुदुर्ग, मंगळवार, २१ जानेवारी २०२०



दोडामार्ग : अन्न महोत्सव कार्यक्रमास उपस्थित सर्व प्राध्यापक व विद्यार्थी. (छाया : जनार्दन परब)

# दोडामार्ग महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी अन्न महोत्सव स्पर्धा

**दोडामार्ग : वार्ताहर**

दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने अन्न महोत्सव २०२० स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थिनी विविध प्रकारचे पदार्थ तयार करून स्पर्धेत सहभाग घेतला .

कार्यक्रमाचे उद्घाटन नगरसेविका सौ.आदिती मणेरीकर यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयाचे प्रा.डॉ. एस.यू. दरेकर यांनी स्वागत केले. विभाग प्रमुख प्रा. एस. एन. जाधव यांनी प्रास्ताविकात स्पर्धेचा हेतू कथन केला. परीक्षक म्हणून चेतन गुळंबेकर व रोहन बागकर उपस्थित होते. वर्गनिहाय विद्यार्थ्यांनी बनवलेल्या रुचकर स्वादिष्ट पदार्थांमधून क्रमांक काढण्यात आले. यामध्ये स्नेहल परब, नेहा नांदोडकर व रामचंद्र पिळणकर या तृतीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थ्यांनी बनविलेल्या 'छोले मसाला' डिशला प्रथम क्रमांक मिळाला. कला शाखेतील कृतिका पोकळे, आसावरी मणेरीकर, समीर ठाकूर यांनी द्वितीय. तर तृतीय क्रमांक अंकिता धण (टी.वाय.बी. कॉम)हिच्या 'मिक्स भाजी भाकरी' डिशला मिळाला. उत्तेजनार्थ क्रमांक स्वाती नाईक, सुभाष गवस, अनिशा धर्णे व सहकाऱ्यांना देण्यात आला. विद्यार्थ्यांनी या पदार्थांचा आस्वाद घेतला. प्रा.पाडगावकर यांनी आभार मानले.

Scanned by CamScanner